ePaper
13 वर्ष कोमात असलेल्या 32 वर्षीय तरुणाला इच्छामरणाची परवानगी
वर्ष - 9 वे | UDYAM-MH-26-0158827
# महाईन्यूज™
WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 12 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 2 वरुन...
'बालगंधर्व रंगमंदिर'चा या वर्षी पुनर्विकास होणारच!

## व्यापारी जहाजांवरील हल्ल्यात दोन जण ठार, एकाचा शोध सुरू

# आखाती तणावात भारतीयांचा बळी!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अमेरिका-इस्रायल-इराण संघर्ष बाराव्या दिवशी पोहोचला असून या तणावाचा परिणाम समुद्री वाहतुकीवरही दिसू लागला आहे. व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यात दोन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला असून एक जण बेपत्ता असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.**

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी बुधवारी दिलेल्या माहितीनुसार, मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यांमध्ये दोन भारतीय नागरिकांनी प्राण गमावले आहेत, तर एक जण अजूनही बेपत्ता आहे.

भारताच्या बंदरे, जहाज वाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सध्या पर्शियन आखातात २८ भारतीय व्यापारी जहाजे असून त्यावर एकूण ७७८ भारतीय खलाशी कार्यरत आहेत.

या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर भारतीय प्रवासी समुदाय असल्याने त्यांच्या सुरक्षिततेला सरकारने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे, असे जयस्वाल यांनी सांगितले. गल्फ सहकार्य परिषदेच्या (GCC) देशांमध्ये सुमारे १ कोटी भारतीय वास्तव्यास असल्याचेही त्यांनी नमूद केले.








## इस्रायलमध्येही एक भारतीय जखमी

जयशंकर यांनी सांगितले की व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांमुळे दोन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला असून एक जण बेपत्ता आहे. या घटनेबद्दल त्यांनी दुःख व्यक्त केले. याशिवाय, इस्रायलमध्ये एक भारतीय जखमी झाला असून दुबईमध्येही एका भारतीयाला दुखापत झाल्याची माहिती समोर आली आहे. परराष्ट्र मंत्रालय या सर्व नागरिकांच्या संपर्कात असून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.



## मंत्री एस. जयशंकर काय म्हणाले?

दरम्यान, लोकसभेत बोलताना परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी सांगितले की, आखाती देश भारताचे महत्त्वाचे व्यापारी भागीदार आहेत आणि दरवर्षी सुमारे २०० अब्ज डॉलर्सचा व्यापार या प्रदेशाशी होतो. त्यामुळे या भागातील अस्थिरता आणि पुरवठा साखळीत निर्माण होणारे अडथळे भारतासाठी गंभीर चिंता निर्माण करणारे आहेत.

# 'बालगंधर्व रंगमंदिर'चा या वर्षी पुनर्विकास होणारच!

## खडलेला प्रकल्प मार्गी; बालगंधर्व रंगमंदिर आधुनिक स्वरूपात उभारण्याची तयारी

**महाईन्यूज । पुणे**

**शहरातील प्रमुख नाट्यगृह अशी ओळख असलेल्या बालगंधर्व रंगमंदिराचा पुनर्विकास आणि नूतनीकरण करण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात करण्यात आली आहे. १९६८ साली बांधण्यात आलेल्या बालगंधर्व रंगमंदिरात अनेक त्रुटी जाणवण्यास सुरुवात झाली असून, कलाकारांच्या तक्रारीदेखील वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर या वास्तूचा या वर्षी पुनर्विकास करण्याचा संकल्प महापालिका प्रशासनाने सोडला आहे. या वर्षी हा प्रश्न मार्गी लावला जाईल, असे शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले.**



शहरातील प्रमुख नाट्यगृह असलेल्या बालगंधर्व रंगमंदिराच्या नूतनीकरणाचे काम गेले अनेक वर्षांपासून रखडलेले आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे महापालिकेचे स्थायी समिती अध्यक्ष असताना त्यांनी बालगंधर्व रंगमंदिराच्या पुनर्विकास करण्याचे जाहीर केले होते. मात्र, त्यानंतर त्याला कलाकार, सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींकडून झालेल्या विरोधामुळे हा प्रकल्प रखडला. मात्र, आता हा प्रकल्प पूर्ण करण्याचा ध्यास महापालिका प्रशासनाने घेतला असून, त्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जात आहेत.

महापालिकेचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प मांडताना महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनीदेखील 'बालगंधर्व'बाबत ठोस भूमिका घ्यावी लागणार असल्याचे वक्तव्य केले होते. काळानुसार येथे उपलब्ध असलेल्या सुविधांमध्ये बदल करणे आवश्यक असून, यासाठी यासाठी वेळप्रसंगी कठोर निर्णय घ्यावा लागणार असल्याचे संकेत राम यांनी दिले आहेत.

बालगंधर्व रंगमंदिराचा पुनर्विकास आणि नूतनीकरणाचे काम या वर्षीच सुरू करून तातडीने पूर्णत्वास नेण्याचा निर्धार महापालिका प्रशासनाने केला आहे. हे काम करताना एकूण १ हजार ८०० आसन व्यवस्था असलेली तीन आधुनिक प्रेक्षागृहे, अत्याधुनिक रंगमंच, ध्वनी, प्रकाश व्यवस्था, कलाकारांसाठी सुधारित मेकअप रूम, ग्रीन रूम, स्वच्छ व आधुनिक शौचालये, पाणीपुरवठा व्यवस्था, सीसीटीव्ही, वातानुकूलिन व सुरक्षा व्यवस्था, प्रेक्षकांसाठी अधिक पार्किंग सुविधा, सुशोभीकरण, परिसराचे सुशोभीकरण, इतर सांस्कृतिक सुविधा या बाबींचा समावेश केला जाणार आहे. हे बांधकाम वर्षभरात पूर्ण करणार असल्याचा निर्धार महापालिका प्रशासनाने केला आहे.

पुणे शहरातील सर्वात जुने आणि मोठे नाट्यगृह म्हणून बालगंधर्व रंगमंदिराची ओळख आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात असल्याने विविध मराठी नाटक, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी बालगंधर्व रंगमंदिराची मोठी मागणी आयोजकांकडून होत असते. आठ वर्षांपूर्वी या वास्तूचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र त्यासाठी झालेल्या विरोधामुळे हे काम रखडले होते.

### वर्षभरात पुनर्विकासाचे नियोजन

महापालिकेचे शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर म्हणाले, बालगंधर्व रंगमंदिराच्या पुनर्विकासाचे काम वर्षभरात करण्याचे नियोजन आहे. यासाठी आवश्यक ती पावले उचलली जात आहे. येथे पुरेशा सोयीसुविधा मिळत नसल्याच्या तक्रारी कलाकार, नागरिकांकडून केल्या जात आहेत. त्यामुळे हे नूतनीकरण आणि पुनर्विकासाचे काम करणे गरजेचे आहे.

# पुण्यात बुकिंग असूनही LPG सिलिंडर मिळेना? ई-केवायसीसाठी लांब रांगा

**महाईन्यूज । पुणे**

**इराण युद्धाचा फटका आता घरातील एलपीजी गॅसलाही बसू लागला आहे. सरकारने एलपीजी टंचाईवर मात करण्यासाठी उद्योग, हॉटेलना गॅस सिलिंडर बंद करून घरगुती ग्राहकांना प्राथमिकता देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु, पुण्यात आज विविध गॅस एजन्सींसमोर ग्राहकांच्या रांगा लागल्याचे चित्र दिसत आहे.**




सध्या घरगुती गॅस सिलिंडरचा मोठा तुटवडा निर्माण झाल्याचे चित्र राज्यातील अनेक शहरांमध्ये दिसून येत आहे. विशेषतः पुणे शहरात ही समस्या अधिक तीव्र झाली असून नागरिक अक्षरशः रस्त्यावर उतरल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. शहरातील विविध गॅस एजन्सींसमोर सकाळपासूनच ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या दिसत आहेत. अनेक ठिकाणी महिला, ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदार वर्गालाही तासनतास रांगेत उभे राहावे लागत आहे. गॅस सिलिंडर मिळेल की नाही याची खात्री नसतानाही नागरिक एजन्सीसमोर थांबून राहतात. विशेष म्हणजे, ऑनलाइन किंवा फोनवरून गॅस बुकिंग करूनही सिलिंडर वेळेवर मिळत नसल्याने गृहिणींचे घरगुती नियोजन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. त्यामुळे स्वयंपाकघर चालवणेही कठीण झाले असून घरगुती बजेटवरही त्याचा मोठा परिणाम होत आहे.

अनेक ग्राहकांनी काही दिवसांपूर्वीच गॅस बुकिंग केलेले आहे. मात्र एजन्सीकडून 'सध्या स्टॉक उपलब्ध नाही', 'पुरवठा उशिरा होत आहे', 'काही दिवस प्रतीक्षा करावी लागेल' किंवा 'कंपनीकडून सिलिंडर येण्यास विलंब होत आहे' अशी उत्तरे दिली जात आहेत. त्यामुळे ग्राहकांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी आणि असंतोष व्यक्त केला जात आहे. काही ठिकाणी ग्राहक आणि एजन्सी कर्मचाऱ्यांमध्ये वाद होण्याच्या घटनाही समोर येत आहेत. दरम्यान आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या इराण-इस्रायल युद्धामुळे ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम झाल्याची चर्चा आहे. त्याचा परिणाम केवळ व्यावसायिक किंवा कमर्शिअल गॅसवरच नव्हे, तर घरगुती एलपीजी गॅस पुरवठ्यावरही होत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये गॅस टंचाई अधिक वाढेल की काय अशी भीती निर्माण झाली आहे.

दरम्यान शासनाने गॅस जोडणीसाठी ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य केली आहे. ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ग्राहकांना प्रत्यक्ष गॅस एजन्सीवर जाऊन बायोमेट्रिक पडताळणी करावी लागत आहे. यासाठी आधार कार्ड आणि इतर कागदपत्रे घेऊन नागरिकांना एजन्सीवर उपस्थित राहावे लागते. मात्र या प्रक्रियेदरम्यानही अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. काही ठिकाणी सर्व्हर डाऊन होणे, इंटरनेटचा वेग कमी असणे, बायोमेट्रिक यंत्रणा व्यवस्थित काम न करणे किंवा अंगठ्याचे ठसे न जुळणे अशा समस्या वारंवार समोर येत आहेत. त्यामुळे अनेक नागरिक तासनतास रांगेत उभे राहूनही ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करू शकत नाहीत. यामुळे लोकांचा संताप वाढत असून एजन्सीसमोर गोंधळाचे वातावरण निर्माण होत आहे.

### दुसरे कनेक्शन चर्चेत

अनेक कुटुंबांकडे एकापेक्षा जास्त गॅस कनेक्शन असल्याचेही समोर येत आहे. आतापर्यंत बहुतेक जण गरजेनुसार केवळ एकाच कनेक्शनचा वापर करत होते आणि दुसरे कनेक्शन वापरात नव्हते. इराण युद्धामुळे एलपीजी गॅसची टंचाई निर्माण होऊ शकते अशी चर्चा सुरू होताच नागरिकांना दुसऱ्या वापरात असलेल्या गॅस कनेक्शनची आठवण झाली आहे.

# फुटपाथ-सायकल ट्रॅकवरील दुचाकींना ‘ब्रेक’

## वाहतूक सक्षमीकरण : भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या पुढाकाराने कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपळे सौदागर (प्रभाग क्र. २८) परिसरातील कोकणे चौक ते स्वराज चौक या बीआरटी मार्गावर फुटपाथ व सायकल ट्रॅकवरून सुरू असलेली दुचाकींची वाहतूक रोखण्यासाठी भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी पुढाकार घेत ठोस पाऊल उचलले आहे. त्यांच्या सूचनेनुसार बीआरटीएस विभागाला या मार्गावर बोलार्ड्स बसविण्याचे आदेश देण्यात आले असून त्यामुळे पादचारी व सायकलस्वारांना सुरक्षित आणि मोकळा मार्ग उपलब्ध होणार आहे.**





कोकणे चौक ते स्वराज चौक या बीआरटी मार्गावर काही वाहनचालकांकडून फुटपाथ आणि सायकल ट्रॅकचा गैरवापर करून दुचाकी चालवली जात असल्यामुळे पादचारी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सायकलस्वारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या गंभीर समस्येची दखल घेत भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी तातडीने बीआरटीएस विभागाशी संपर्क साधून फुटपाथच्या सुरुवातीला आणि शेवटी बोलार्ड्स बसविण्याच्या सूचना दिल्या.

नगरसेविका अनिताताई काटे आणि नगरसेविका कुंदाताई भिसे यांनीही या निर्णयाला पाठिंबा देत नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली होती. या उपाययोजनेमुळे आता दुचाकी वाहनांना फुटपाथ व सायकल ट्रॅकवरून ये-जा करणे शक्य होणार नाही. परिणामी पादचारी नागरिकांना सुरक्षितपणे चालण्यासाठी मोकळा मार्ग मिळेल, तसेच सायकलस्वारांसाठी तयार करण्यात आलेला सायकल ट्रॅकही सुरक्षित राहणार आहे. या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या पुढाकाराचे कौतुक केले आहे.

याबाबत बोलताना शत्रुघ्न काटे म्हणाले की, “फुटपाथ आणि सायकल ट्रॅक हे पादचारी आणि सायकलस्वारांसाठी असतात. काही वाहनचालकांकडून त्याचा गैरवापर होत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे बीआरटीएस विभागाला तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. नागरिकांना सुरक्षित आणि सुलभ पायवाट मिळणे ही आमची प्राथमिकता आहे.”

> “ पिंपळे सौदागर परिसरातील नागरिकांची सुरक्षितता आणि सोय ही आमच्यासाठी सर्वात महत्त्वाची आहे. फुटपाथ आणि सायकल ट्रॅक हे पादचारी व सायकलस्वारांसाठीच असतात; त्यांचा कोणत्याही प्रकारे गैरवापर होऊ देणार नाही. त्यामुळे कोकणे चौक ते स्वराज चौक या बीआरटी मार्गावर दुचाकींची वाहतूक रोखण्यासाठी तातडीने बोलार्ड्स बसवण्याच्या सूचना दिल्या आहेत. पुढेही नागरिकांना सुरक्षित, सुसज्ज आणि शिस्तबद्ध वाहतुकीची व्यवस्था मिळावी यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहू.
>
> – **शत्रुघ्न काटे,** शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियान

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारतीय जनता पार्टीच्या आगामी पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियान २०२६ च्या यशस्वी आयोजनासाठी आज महत्त्वपूर्ण पूर्वतयारी बैठक संपन्न झाली. या बैठकीत पक्षाच्या उच्चस्तरीय पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित राहून आगामी प्रशिक्षणासाठी सखोल नियोजन व चर्चा केली.**



भारतीय जनता पार्टी म्हणजे संस्कार, विचार आणि राष्ट्रसेवेची संघटना असून, स्व. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानवदर्शन या वैचारिक सिध्दांतांवर आधारित हे प्रशिक्षण महाभियान, कार्यकर्त्यांच्या वैचारिक विकासासोबत संघटनात्मक बळकटीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

या बैठकीत प्रशिक्षण महाभियानाचे नियोजन, कार्यपद्धती, कार्यकर्त्यांची तयारी, तसेच आगामी उपक्रमांची रूपरेषा यावर सखोल चर्चा करण्यात आली. २०२६ च्या दृष्टीने संघटन अधिक सक्षम, शिस्तबद्ध व विचारनिष्ठ करण्यासाठी हे महाभियान ठोस दिशादर्शक ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी सरचिटणीस विकास डोळस, सरचिटणीस वैशाली खाड्ये, मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे, अजित बुर्डे, रामदास कुटे, अजय साने, प्रमोद परदेशी आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

भाजपा वरिष्ठ उपाध्यक्ष संजय पटनी यांनी या प्रशिक्षण महाभियानाची महत्त्वपूर्ण माहिती कार्यकर्त्यांना दिली. त्यांनी सांगितले की, कार्यकर्त्यांच्या माध्यमातून पक्षाचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवणे, संघटन अधिक मजबूत करणे आणि राष्ट्रसेवेच्या ध्येयाने प्रेरित कार्यकर्ते घडवणे हा या प्रशिक्षण महाभियानाचा मुख्य उद्देश आहे. पक्षाच्या वैचारिक आणि संघटनात्मक बळकटीसाठी हे महाभियान ठळक पाऊल ठरणार असून, २०२६ मध्ये भारतीय जनता पक्षाचे कार्यक्षेत्र अधिक व्यापक, सशक्त आणि विचारसंपन्न करण्यास मोठा हातभार लागणार आहे.

> “ पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियान हे केवळ कार्यकर्त्यांचे कौशल्य विकसित करण्याचे साधन नाही, तर हे पक्षाच्या विचारसरणीचा प्रसार, संघटनात्मक बळकटी आणि राष्ट्रसेवेची ज्वाला प्रत्येक कार्यकर्त्यामध्ये उजळवण्याचे माध्यम आहे. २०२६ मध्ये आपण सर्व मिळून संघटन अधिक सशक्त, शिस्तबद्ध आणि विचारनिष्ठ बनवू, असा संकल्प आहे. यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजसेवा आणि संघटन मजबुतीसाठी करणे आवश्यक आहे.
>
> –**संजय पटनी,** वरिष्ठ उपाध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.



## भूमिका

**सध्या सुरू असलेल्या युद्धामुळे भारतावर आर्थिक परिणाम होण्यास सुरुवात झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये मोठी उसळी आली असून प्रति बॅरल दर सुमारे 110 डॉलरपर्यंत पोहोचला आहे. अवघ्या आठ दिवसांत हा दर जवळपास दुपटीने वाढल्याचे दिसत आहे. राहिले आहे.**

# मोठ्या आर्थिक संकटाची चाहूल




त्यामुळे देशासमोर इंधन दरवाढीचे मोठे संकट उभे राहिले आहे. त्याचबरोबर इंधनाच्या उपलब्धतेबाबतही अनिश्चितता निर्माण झाली आहे.

या युद्धाचे इतरही आर्थिक परिणाम दिसू लागले आहेत. शेअर बाजारात मोठी पडझड झाली असून गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या दहा दिवसांत शेअर बाजार सुमारे आठ टक्क्यांहून अधिक घसरला आहे. काही दिवसांपूर्वी तर एका दिवसातच बाजार 1800 ते 2000 अंकांनी कोसळल्याची स्थिती पाहायला मिळाली. या सततच्या घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान झाले असून अंदाजे 20 लाख कोटी रुपयांची संपत्ती काही दिवसांतच बाजारातून नाहीशी झाल्याचे सांगितले जात आहे.

युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळीवरही मोठा परिणाम झाला आहे. अनेक देशांमधील व्यापार आणि वाहतूक व्यवस्थेत अडथळे निर्माण झाले आहेत. त्याचा परिणाम भारतावरही होणार आहे. विशेषतः इंधन पुरवठ्याबाबत परिस्थिती चिंताजनक बनली आहे. भारत मोठ्या प्रमाणात आखाती देशांकडून कच्चे तेल आयात करतो. मात्र युद्धामुळे त्या पुरवठ्यात अडथळे येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाचा दर 110 डॉलरच्या पातळीवर गेला असून पुढील काळात तो आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अशा परिस्थितीत इतक्या महाग दराने तेल आयात करून ते सध्याच्या दरात ग्राहकांना पुरवणे सरकारसाठी अवघड ठरणार आहे. त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीची शक्यता आता जवळपास निश्चित मानली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर घरगुती स्वयंपाकाच्या गॅसच्या दरातही वाढ करण्यात आली आहे. अलीकडेच गॅस सिलेंडरच्या दरात 60 रुपयांनी वाढ झाली आहे. याशिवाय गॅस सिलेंडरच्या उपलब्धतेवरही काही मर्यादा घालण्यात आल्या आहेत. नवीन नियमांनुसार आता एका कुटुंबाला महिन्याला फक्त एकच सिलेंडर मिळू शकणार आहे. तसेच एकदा गॅस सिलेंडर बुक केल्यानंतर पुढील सिलेंडरसाठी किमान 30 दिवसांचा कालावधी पूर्ण होणे आवश्यक राहणार आहे.

सध्या उपलब्ध असलेला एलपीजी गॅस प्रामुख्याने घरगुती ग्राहकांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. त्यामुळे उद्योगांसाठी होणारा एलपीजी पुरवठा मर्यादित करण्यात आला असून काही ठिकाणी तो जवळपास बंद करण्यात येत आहे. कच्च्या तेलाच्या बाबतीत मात्र एक पर्याय उपलब्ध झाला आहे. आखाती देशांकडून तेल मिळण्यात अडचण आली तरी रशियाकडून तेल आयात करण्याची परवानगी भारताला देण्यात आली आहे. मात्र ही परवानगी फक्त 30 दिवसांसाठीच असल्याचे सांगितले जात आहे. तसेच सध्या समुद्रात असलेल्या रशियन जहाजांमधूनच हे तेल घ्यावे लागणार आहे.

यामुळे भारतात तेलाची टंचाई निर्माण होणार नाही ही बाब सकारात्मक मानली जात आहे. मात्र रशिया हे तेल पूर्वीसारख्या सवलतीच्या दरात देईल की आंतरराष्ट्रीय दराने देईल, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. अमेरिकेच्या परवानगीनुसार भारत रशियाकडून तेल आयात करीत असल्याने रशियाही आता व्यापारी दृष्टिकोनातून निर्णय घेऊ शकतो. त्यामुळे भारताला हे तेल आंतरराष्ट्रीय बाजारभावानुसारच घ्यावे लागण्याची शक्यता आहे. परिणामी इंधन महागाईचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## प्रासंगिक »

### अहंकारी राजाला धडा

***एक अहंकारी राजा होता. त्याला आपल्या संपत्ती, शक्ती आणि रूपाचा फार गर्व होता. तो नेहमी इतरांना कमी लेखत असे आणि त्यांचा अपमान करत असे. त्यामुळे राज्यातील लोक त्याच्यावर नाराज होते.***

त्याच राज्यात एक विद्वान पंडित राहत होता. राजाचा गर्व कमी करण्यासाठी तो एके दिवशी दरबारात गेला. राजाने गर्वाने सांगितले, “तुम्हाला जे हवे ते मागा, मी दान देईन.” हे ऐकून पंडित हसू लागला आणि म्हणाला, “राजन, तुमच्याकडे मला देण्यासारखे काहीच नाही.” राजा रागावला. तेव्हा पंडित शांतपणे म्हणाला, “तुमचा जन्म आई-वडिलांमुळे झाला, अन्न धरतीमातेचे आहे, धन प्रजेचे आहे, राज्य पूर्वजांचे आहे आणि प्राण ईश्वराची देणगी आहेत.” “मग यात तुमचे काय आणि तुम्ही कशाचा गर्व करता?” असे पंडिताने विचारले. हे ऐकून राजाला आपली चूक कळली आणि त्याने अहंकार सोडून दिला. त्या दिवसापासून राजा नम्र आणि न्यायीपणे राज्य करू लागला.

तात्पर्य:- जे आपले नाही त्यावर गर्व बाळगणे व्यर्थपणाचे आहे.

अवघ्या पाच-सहा वर्षांच्या एका स्टार्टअप कंपनीने जगातील सर्वात बलाढ्य संरक्षण मंत्रालयावर खटला दाखल करणे ही स्वतःतच विलक्षण घटना आहे. अशी घटना प्रामुख्याने खऱ्या अर्थाने लोकशाही असलेल्या देशांतच घडू शकते. त्यामुळे या प्रकरणाची पार्श्वभूमी आणि त्यामागील कारणे समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

# एआय तंत्रज्ञानावरून अमेरिकेत सरकार विरुद्ध स्टार्टअप संघर्ष

‘अँथ्रोपिक’ ही कॅलिफोर्नियातील एक वेगाने प्रगती करणारी तंत्रज्ञान कंपनी असून ती कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय क्षेत्रात काम करते. या कंपनीने विकसित केलेला ‘क्लॉड’ हा एआय सहाय्यक अलीकडे जगभर चर्चेत आला. सध्या ‘गूगल’चा ‘जेमिनी’ आणि ‘मायक्रोसॉफ्ट’शी संबंधित ‘चॅट जीपीटी’ हे एआय सहाय्यक सर्वाधिक परिचित आहेत. मात्र ‘अँथ्रोपिक’चा ‘क्लॉड’ या दोन्हींपेक्षा अधिक प्रगत मानला जात आहे. त्याची क्षमता इतकी प्रभावी मानली जाते की माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक कंपन्यांच्या शेअर्सवर त्याचा परिणाम झाला. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या पुढील पिढीची निर्मिती स्वतः एआय प्रणाली करू शकतील, अशी शक्यता ‘क्लॉड’मुळे व्यक्त होऊ लागली आहे.




या यशामुळे अमेरिकेच्या सरकारचेही या तंत्रज्ञानाकडे लक्ष गेले. डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने संरक्षण मंत्रालयामार्फत ‘अँथ्रोपिक’ कंपनीशी करार करून ‘क्लॉड’चा वापर सुरू केला. सुरुवातीला हा वापर मर्यादित होता; परंतु ‘क्लॉड’ची क्षमता लक्षात आल्यानंतर संरक्षण मंत्रालयाने त्याचा अधिक व्यापक वापर करण्याची इच्छा व्यक्त केली.

यामध्ये दोन प्रमुख गोष्टींचा समावेश होता. पहिली म्हणजे शत्रू देशांवर क्षेपणास्त्र हल्ले कधी आणि कुठे करायचे याबाबत निर्णय घेण्यासाठी ‘क्लॉड’चा वापर करणे. दुसरी म्हणजे गर्दीतून विशिष्ट व्यक्तींची चेहरे ओळखून त्याबाबत सरकारला माहिती देणे. दुसरा उपयोग प्रत्यक्षात नागरिकांवर हेरगिरी करण्यासारखा होता, तर पहिल्या उपयोगामुळे महत्त्वाचे लष्करी निर्णय कृत्रिम बुद्धिमत्तेवर सोपवले गेले असते.

ही दोन्ही मागणी ‘अँथ्रोपिक’ने धोकादायक मानली. अशा संवेदनशील निर्णयांमध्ये मानवी विवेक आणि जबाबदारी आवश्यक असते, असे कंपनीचे मत होते. उदाहरणार्थ, एआयच्या सल्ल्यामुळे एखाद्या ठिकाणी क्षेपणास्त्र हल्ला झाला आणि मोठा विनाश झाला तर त्याची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तसेच अमेरिकन कायद्यानुसार नागरिकांवर अनियंत्रित हेरगिरी करणेही चुकीचे मानले जाते. त्यामुळे ‘अँथ्रोपिक’ने संरक्षण मंत्रालयाच्या या मागण्या स्पष्टपणे नाकारल्या.

या निर्णयामुळे सरकार नाराज झाले. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि संरक्षणमंत्री पीट हॅगसेथ यांनी कंपनीवर सार्वजनिक टीका केली. इतक्या लहान कंपनीने सरकारला नकार देणे त्यांना मान्य नव्हते. त्यानंतर सरकारने या कंपनीला ‘काळ्या यादीत’ टाकण्याचा इशारा दिला आणि तिला ‘सप्लाय चेन रिस्क’ म्हणजेच धोकादायक कंपनी म्हणून घोषित करण्याची प्रक्रिया सुरू केली.

या वादात ‘अँथ्रोपिक’ची प्रतिस्पर्धी कंपनी ‘ओपन एआय’ही पुढे आली.

## ।। अभंगवाणी ।।



सुंदर तें ध्यान उभे विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनियां ॥१॥

तुळसीचे हार गळां कासे पीतांबर ।
आवडे निरंतर तें चि रूप ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आमदाराच्या संपत्तीचा सभागृहात उल्लेख

## विधानसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना फडणवीसांचा ठाकरेंच्या आमदाराला टोला

**महाईन्यूज । मुंबई**

**सध्या विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनादरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये विविध मुद्द्यांवरून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. यातच आज विधानसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीसांनी विरोधकांनी केलेल्या आरोपांना प्रत्युत्तर दिलं. यावेळी मुख्यमंत्री फडणवीसांनी उबाठाचे आमदार सुनील प्रभू यांच्यावर टीका करत थेट त्यांची संपत्तीच काढली. तसेच नॉर्वे, थायलंडपेक्षाही आपली अर्थव्यवस्था मोठी असल्याचं मुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितलं.**



विधानसभेत आज अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांनी केलेल्या आरोपांना प्रत्युत्तर दिले. शिवसेनेचे (ठाकरे) आमदार सुनील प्रभू यांनी आपल्या भाषणात राज्यावर वाढलेल्या कर्जाचा मुद्दा पुढे केला होता. यावर उत्तर देताना फडणवीस यांनी सुनील प्रभू यांच्या संपत्तीचा दाखला दिला. फडणवीस म्हणाले, "प्रभू साहेब मी तुमचे निवडणुकीचे प्रतिज्ञापत्र तपासले. तुमच्या प्रतिज्ञापत्रात संपत्ती १४ कोटी आणि कर्ज ३.५४ लाख रुपये असल्याचे नमूद आहे. कर्जाचा विचार केल्यास तुमच्यावर २५.२८ टक्के दायित्व आहे. एवढ्या दायित्वामुळे तुम्ही कर्जबाजारी होणार का? तुम्हाला नादारी घोषित करावी लागणार का? हे शक्यच नाही. प्रभू यांना एवढ्याशा कर्जामुळे नादारी घोषित करावी लागणार नाही. त्या प्रमाणे राज्यावर १८ टक्केच कर्ज आहे. त्यामुळे प्रभू यांच्यापेक्षा महाराष्ट्राची परिस्थिती थोडी उत्तम आहे."

अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यात सध्या सुरू असलेल्या युद्धाची झळ सामान्य नागरिकांना बसू लागली आहे. देशातील विविध शहरांमधील गॅस तुडवड्याच्या पार्श्वभूमीवर विरोधकांकडून सरकारला घेरले जात आहे. खासदार संजय राऊतांनी पंतप्रधान मोदी यांच्या जुन्या विधानाचा संदर्भ देत खोचक टीका केली. राऊत म्हणाले की, "मोदी हे फार मोठे वैज्ञानिक आणि संशोधक आहेत. त्यांनी काही वर्षांपूर्वी एक शोध लावला होता की नाल्यातून गॅस निर्मिती करता येते. नाल्यामध्ये पाइप टाकायचा आणि त्यामधील गॅसवर आपल्या घरातील चुली पेटवता येतात. हा त्यांचा शोध आम्हाला आठवला आहे. आम्ही असा विचार करत आहोत की, नाल्यातून गॅस निर्मितीच्या पहिल्या प्रकल्पाचं उद्धाटन हे मिठी नदीच्या... मिठी नदीच्या किनाऱ्यावर अशा प्रकारच्या गॅस निर्मितीचा प्रकल्प मोदींच्या संकल्पनेतून निर्माण करता येईल का? त्याचं उद्घाटन करण्यासाठी मग फडणवीस आणि मुंबईच्या महापौरांनी मोदी यांनाच बोलवावं", अशी खोचक टीका संजय राऊतांनी केली. "महाराष्ट्र हे राष्ट्र असतं तर आपण जगातून सर्वात मोठी तिसावी अर्थव्यवस्था असतो. पहिल्या ३५ देशांचा विचार केला तर महाराष्ट्राने ऑस्ट्रीया, थायलंड, फिलिपिन्स, नॉर्वे, व्हिएतनाम आणि बांगलादेश यांच्यापेक्षा आपली अर्थव्यवस्था मोठी झाली आहे. आपला विकासदर आपण कायम राखू शकलो तर पुढच्या दोन ते तीन वर्षात युएई आणि सिंगापूर या देशांच्या अर्थव्यवस्थानांही आपण मागे टाकू शकू. २०१३-१४ साली राज्याचा जीएसडीपी १६ लाख कोटी रुपये होता. गेल्या १० वर्षात राज्याचा जीएसडीपी १६ लाख कोटींहून ५१ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. १० वर्षांत तीन पट अधिक वाढ झाली आहे", असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं.

### 'हे' महाशय गेले कुठे?

दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणात अनेक शंका व्यक्त केल्या जात आहेत. या प्रकरणावर आता आमदार अमोल मिटकरी यांनी संशय व्यक्त करत अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. अमोल मिटकरी यांनी नरेश अरोरा यांच्यावर निशाणा साधला. नावाचा उल्लेख न करता छायाचित्र वापरून त्यांनी हे महाशय गेले कुठे? असा प्रश्न उपस्थित केला. या सर्व प्रकरणावर महाराष्ट्राचा दुर्लक्ष होतंय का? असे मिटकरी म्हणाले. "अजितदादांच्या विमान अपघात दुर्घटनेनंतर सध्या हे महाशय कुठं आहेत? यांच्याकडे महाराष्ट्राचं दुर्लक्ष होतंय का? कारण त्यांचे विचार ऐकून आता त्यांचा शोध महाराष्ट्राने घ्यायलाच पाहिजे", अशी पोस्ट अमोल मिटकरी यांनी केली.

# एलपीजी सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई

**महाईन्यूज । नागपुर**

**राज्यात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी नागपूर जिल्हा प्रशासन आणि पोलिसांनी एलपीजी गॅस सिलिंडरच्या साठेबाजी व काळाबाजाराविरोधात कडक कारवाई सुरू केली आहे. जिल्हाधिकारी विपिन इटनकर यांच्या सूचनेनुसार नागरी पुरवठा विभाग, पोलीस प्रशासन आणि संबंधित यंत्रणा शहरातील गॅस एजन्सी, गोदामे आणि वितरण केंद्रांची तपासणी करत आहेत.**



नागपूर शहरात एलपीजी सिलिंडरचा तुटवडा निर्माण होत असल्याच्या तक्रारी मागील काही दिवसांपासून समोर येत होत्या. काही ठिकाणी घरगुती आणि व्यावसायिक सिलिंडर चढ्या दराने विकले जात असल्याचीही माहिती प्रशासनाला मिळाली होती. या पार्श्वभूमीवर नागपूर पोलिसांनी विशेष तपास मोहीम सुरू केली आहे. पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल यांनी सर्व पोलीस ठाण्यांना त्यांच्या हद्दीत बेकायदेशीरपणे सिलिंडर विक्री करणाऱ्यांवर आणि साठेबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

तपासणीदरम्यान काही ठिकाणी पाच किलोच्या सिलिंडरसह अनेक कमर्शियल सिलिंडरही आढळून आले. त्यामुळे सिलिंडरचा वापर नियमानुसार होत आहे का, तसेच घरगुती गॅसचा वापर व्यावसायिक कारणांसाठी तर होत नाही ना, याचीही तपासणी केली जात आहे. नागरी पुरवठा विभागाचे तीन निरीक्षक आणि दोन परिमंडळ अधिकारी अशा पथकाद्वारे शहरातील विविध भागांमध्ये ही तपास मोहीम राबवली जात आहे. दरम्यान, पोलिसांकडूनही या संपूर्ण प्रकरणावर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. गुन्हे शाखेची विशेष पथके शहरातील संशयास्पद ठिकाणांवर नजर ठेवून आहेत. तसेच एलपीजी वितरण केंद्रांची नियमित तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आवश्यक असल्यास संशयास्पद गोदामांवर अचानक छापे टाकण्याची तयारीही पोलिसांनी ठेवली आहे. याशिवाय, यापूर्वी एलपीजी सिलिंडरच्या काळाबाजारात किंवा अवैध व्यापारात सहभागी असलेल्या व्यक्तींची यादीही पोलिसांनी तयार केली आहे. अशा व्यक्तींच्या हालचालींवर विशेष लक्ष ठेवले जात आहे. साठेबाजी किंवा अवैध विक्री करताना कोणी आढळल्यास त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे. दरम्यान, प्रशासनाने नागरिकांनाही आवाहन केले आहे की, कुठेही गॅस सिलिंडरचा काळाबाजार किंवा साठेबाजी होत असल्याची माहिती मिळाल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याला किंवा प्रशासनाला कळवावे. नागरिकांच्या सहकार्यामुळेच अशा अवैध प्रकारांना आळा घालणे शक्य होईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### गॅस एजन्सी आणि गोदामांची अधिकाऱ्यांकडून तपासणी

नागरी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी नागपूरमधील सदर परिसरातील एका डोमेस्टिक गॅस एजन्सीच्या कार्यालयात जाऊन तपासणी केली. त्यानंतर जरीपटका येथे असलेल्या त्या एजन्सीच्या गोदामात प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. गोदामात दाखवलेला गॅस सिलिंडरचा साठा आणि प्रत्यक्ष वितरण यामध्ये ताळमेळ आहे का, याची सविस्तर तपासणी करण्यात आली. या तपासणीचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

## १३ वर्ष कोमात असलेल्या ३२ वर्षीय तरुणाला इच्छामरणाची परवानगी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच सर्वोच्च न्यायालयाने एका ३२ वर्षीय तरुणाच्या बाबतीत ‘निष्क्रिय इच्छामरणाची’ (PASSIVE EUTHANASIA) याचिका मान्य केली आहे. गेली १३ वर्षे मृत्यूशी झुंज देणाऱ्या या रुग्णाची वैद्यकीय स्थिती विचारात घेऊन न्यायालयाने हा अत्यंत संवेदनशील आणि कायदेशीरदृष्ट्या महत्त्वाचा निर्णय दिला.**



१३ वर्षापासून ३२ वर्षीय हरीश राणा कोमामध्ये आहे. त्याच्या कुटुंबियांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात निष्क्रिय इच्छामरणाची याचिका दाखल करण्यात आली होती. त्याच्या या याचिकेवर सुनावणी झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने निष्क्रिय इच्छामरणाची परवानगी दिली. इच्छामरणाच्या परवानगीवर निकाल मिळालेला हा पहिलाच खटला आहे. रुग्णाची वैद्यकीय स्थिती आणि इतर परिस्थितीचा विचार केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने ही परवानगी दिली.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार, अर्जदाराला (हरीश राणा) देण्याते येणारे वैद्यकीय उपचार, ज्यात क्लिनिकली असिस्टेड न्यूट्रिशन (सीएएन) समाविष्ट आहे, ते थांबविण्यात येणार आहे. खंडपीठाने म्हटले की, ही प्रक्रिया मानवी पद्धतीने पार पडायला हवी.

न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. हा निकाल देत असताना सर्वोच्च न्यायालयाने २०१८ च्या “कॉमन कॉज विरुद्ध भारतीय संघराज्य” या निकालातील तत्त्वाचा आधार घेतला. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयातील पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने निष्क्रिय इच्छामरणाला कायदेशीर मान्यता दिली होती. सन्मानाने मरण्याचा हक्क हा भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत जीवनाच्या हक्काचाच एक भाग असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले होते.

### नेमके प्रकरण काय?

उत्तर प्रदेशातील गाझियाबाद शहरातील ३२ वर्षीय हरीश राणा एका दुर्धर आजाराने ग्रस्त आहे. २०१३ मध्ये वयाच्या २०व्या वर्षी इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून पडल्यापासून हरीश राणा निष्क्रिय अवस्थेत बेडवर पडून आहे. वैद्यकीय तज्ज्ञांनी सर्व उपचार करूनही हरीश बरा होण्याची शक्यता नसल्याचा दावा त्याच्या आई-वडिलांनी केला. मुलाला होत असलेल्या असह्य यातना सहन होत नसल्याने त्याला इच्छामरणाची परवानगी देण्यात यावी, अशी याचिका हरीशच्या आई-वडिलांनी सर्वोच्च न्यायालयात केली.

### हरीशची वैद्यकीय स्थिती कशी?

रुग्णालयाच्या नोंदीनुसार, हरीशला क्वाड्रिप्लेजिया हा दुर्धर आजार झाला असून, त्याच्या संपूर्ण शरीराला १०० टक्के अपंगत्व आले आहे. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, अशा अवस्थेतील रुग्णांच्या उपचारांचा आर्थिक बोजा अत्यंत मोठा असतो. “आपल्या कुटुंबातील व्यक्तीचे प्राण वाचविण्यासाठी प्रत्येक जण शर्थीचे प्रयत्न करतो. मात्र, अशा व्यक्तींवरील उपचारांचा खर्च प्रचंड आहे आणि रुग्णाचे बरे होण्याची शक्यता अत्यंत कमी असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्यानंतर अनेक कुटुंबे स्वत:हून उपचार थांबविण्याचा निर्णय घेतात,” असे हैदराबादमधील केअर रुग्णालयातील अपघातग्रस्त विभागाचे प्रमुख डॉ. भवानी प्रसाद गुडवल्ली यांनी यांनी एक वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखती मध्ये सांगितले.

# बोलण्याची वेळ येते, तेव्हा राहुल गांधी परदेश दौऱ्यावर जातात

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या विरोधात विरोधकांनी मांडलेल्या अविश्वास प्रस्तावावर लोकसभेत जोरदार चर्चा सुरू असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी विरोधकांवर तीव्र टीका केली. सभागृह नियमांनुसारच चालते आणि कोणालाही नियम मोडून बोलण्याचा अधिकार नाही, असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले.**



लोकसभेत बोलताना अमित शाह म्हणाले की, संसद ही जत्रा नाही. येथे प्रत्येकाला नियमांनुसारच बोलावे लागते. काही लोक हे सर्व भाजपमुळे होत असल्याचे म्हणतात. मात्र लोकसभेचे नियम भाजपच्या काळात बनलेले नाहीत, तर ते जवाहरलाल नेहरू यांच्या काळापासून अस्तित्वात आहेत. काँग्रेसने अनेकदा संसद नियमांचे उल्लंघन केले आहे, यावर चर्चा करण्यास मी तयार आहे, असेही त्यांनी सांगितले. सभागृहातील परंपरा आणि कामकाज हे सत्ताधारी व विरोधकांमधील परस्पर विश्वासावर आधारित असल्याचे शाह यांनी नमूद केले. सभागृहाचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी सभापती महत्त्वाची भूमिका बजावतात. लोकसभेच्या कामकाजासाठी ठरवलेले नियम आणि असंसदीय शब्दांची यादी ही अनेक वर्षांच्या परंपरेतून तयार झाली असून ती सर्व सदस्यांवर बंधनकारक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

लोकसभेत बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, “विरोधी पक्षनेते राहुल गांधी अनेकदा आपल्या अधिकारांबद्दल बोलतात, पण आकडे वेगळीच माहिती सांगतात. १७व्या लोकसभेत त्यांची उपस्थिती ५१ टक्के होती, तर राष्ट्रीय सरासरी ६७ टक्के होती. १६व्या लोकसभेत त्यांची उपस्थिती ५२ टक्के होती, तर राष्ट्रीय सरासरी ८० टक्के होती. १५व्या लोकसभेत त्यांची उपस्थिती ४३ टक्के होती, तर राष्ट्रीय सरासरी ७६ टक्के होती. तरीही ते म्हणतात की त्यांना बोलू दिले जात नाही. प्रत्यक्षात, मी बोलण्याचा प्रयत्न केला की मला संधी दिली जात नाही, असे ते म्हणतात; पण सत्य वेगळेच आहे.” विरोधकांच्या वर्तनावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. सभागृहात कोणीही उठून मनात येईल ते बोलू शकत नाही. विषय आधीच ठरवलेले असतात. आज मी सभापतींविरोधातील अविश्वास प्रस्तावावर बोलण्यासाठी आलो आहे; दुसऱ्या विषयावर बोललो तर सभापती मला बसायला सांगतील, असे त्यांनी सांगितले. विरोधकांच्या बाकांवर अनेक वरिष्ठ नेते आहेत, जसे शशी थरूर आणि टी. आर बालू आहेत. मग तुम्ही आपल्या सहकाऱ्यांना असे वर्तन का शिकवता, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. कागद फाडून अध्यक्षांच्या दिशेने फेकणे किंवा महत्त्वाच्या चर्चेदरम्यान घोषणाबाजी करणे योग्य नाही. विरोधकांच्या महिला खासदारांनी पंतप्रधानांच्या आसनाकडे जाणेही योग्य वाटत नाही, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, या अविश्वास प्रस्तावावर चर्चा सुरू असताना भाजपचे खासदार जगदंबिका पाल हे तात्पुरते सभापती म्हणून काम पाहत आहेत. त्यांच्या नियुक्तीवर विरोधकांनी आक्षेप घेत असंवैधानिक असल्याचा आरोप केला होता.

### सविंधानापेक्षा कोणी मोठे नाही

शाह यांनी पुढे सांगितले की, संविधानाने सदस्यांना काही अधिकार दिले आहेत; मात्र कोणालाही विशेष सवलती दिलेल्या नाहीत. देशात आपत्कालीन परिस्थिती नाही आणि कोणालाही संविधानापेक्षा अधिक अधिकार नाहीत. जो कोणी स्वतःला विशेष अधिकार असल्याच्या भ्रमात जगतो, त्याला अखेर पक्ष आणि जनतेचा पाठिंबा मिळत नाही, असे म्हणत त्यांनी राहुल गांधींवर टीका केली. लोकसभा सभापती हे फक्त अध्यक्षस्थानावर बसणारे अधिकारी नसून ते लोकशाहीच्या प्रतिष्ठेचे प्रतीक आहेत. सभापतींच्या प्रामाणिकतेवर प्रश्न उपस्थित करणे म्हणजे आपल्या लोकशाही व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करणे होय, असे शाह म्हणाले.

# कंगणाच्या 'भारत भाग्य विधाता' चित्रपटाची चर्चा




अभिनेत्री कंगणा राणौत लवकरच एका मोठ्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटातून तिचे दमदार कमबॅक होणार असल्याची चर्चा सध्या रंगत आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाले असून सध्या पोस्ट-प्रॉडक्शनचे काम सुरू आहे. सर्व काही सुरळीत पार पडल्यास हा चित्रपट याच वर्षी प्रदर्शित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाची कथा २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. विशेषतः मुंबईतील कामा आणि अल्ब्लेस रुग्णालयात घडलेल्या घटनांवर हा चित्रपट केंद्रित आहे. त्या काळात रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचाऱ्यांनी अत्यंत धैर्याने परिस्थितीचा सामना करत अनेकांचे प्राण वाचवण्याचा प्रयत्न केला होता. या कर्मचाऱ्यांचे शौर्य, त्याग आणि संकटाच्या काळात दाखवलेली जबाबदारी या चित्रपटातून प्रभावीपणे मांडली जाणार आहे. व्हरायटी इंडियाच्या वृत्तानुसार, कंगणा राणौत या चित्रपटात एका परिचारिकेची भूमिका साकारणार आहे. तिच्या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून संकटसमयी दाखवलेले धैर्य, सेवाभाव आणि मानवतेची भावना प्रेक्षकांसमोर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या चित्रपटात मराठी चित्रपटसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री गिरिजा ओक देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन मनोज टपारिया यांनी केले आहे. वास्तव घटनेवर आधारित असलेला हा चित्रपट प्रेक्षकांसाठी भावनिक, प्रेरणादायी आणि थरारक अनुभव ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, कंगणा राणौत लवकरच अभिनेता आर. माधवनसोबत दिग्दर्शक ए. एल. विजय यांच्या आणखी एका चित्रपटात झळकणार असल्याची चर्चा आहे. तसेच "ब्लेस्ड बी द एव्हिल" या चित्रपटातून ती हॉलीवूडमध्ये पदार्पण करणार असल्याच्या बातम्याही समोर येत आहेत.

# 4 वर्षांतच मोडला संसार



बॉलिवूड आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री HANSIKA MOTWANI हिच्या खासगी आयुष्याबाबत अलीकडेच एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून तिच्या वैवाहिक आयुष्यात मतभेद असल्याच्या चर्चा सुरू होत्या आणि आता त्या चर्चांवर अधिकृत शिक्कामोर्तब झाले आहे. अभिनेत्री हंसिका मोटवानी आणि तिचा पती SOHAIL KATHURIA यांनी परस्पर संमतीने घटस्फोट घेतला असल्याची माहिती समोर आली आहे. मुंबईतील बांद्रा येथील फॅमिली कोर्टाने दोघांच्या घटस्फोटाच्या अर्जावर सुनावणी करत अंतिम निर्णय दिला आहे. हंसिका मोटवानीने ४ डिसेंबर २०२२ रोजी SOHAIL KATHURIA याच्याशी राजस्थानमधील JAIPUR येथे अतिशय थाटामाटात लग्न केले होते. या लग्नाची देशभरात मोठी चर्चा झाली होती. राजेशाही पद्धतीने पार पडलेल्या या 'रॉयल वेडिंग'चे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. चाहत्यांनीही या जोडप्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला होता. मात्र, लग्नानंतर काही काळातच त्यांच्या नात्यात मतभेद निर्माण झाल्याच्या बातम्या समोर येऊ लागल्या. गेल्या काही महिन्यांपासून हंसिका आणि सोहेल वेगळे राहत असल्याची चर्चा होती. हंसिकाने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवरून लग्नाचे अनेक फोटो आणि व्हिडिओ हटवले होते, त्यामुळे त्यांच्या नात्यात दुरावा आल्याच्या चर्चा अधिकच जोर धरू लागल्या. अखेर दोघांनीही परस्पर सहमतीने विभक्त होण्याचा निर्णय घेतला आणि न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता. न्यायालयाने त्यावर सुनावणी करत त्यांचा घटस्फोट मंजूर केला आहे. विशेष म्हणजे, हंसिकाने या घटस्फोटासाठी कोणतीही पोटगी (ALIMONY) किंवा आर्थिक मदतीची मागणी केलेली नाही. दोघांनीही शांततेत आणि सामंजस्याने आपापल्या वाटा वेगळ्या करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. सोहेल कथुरियाचे हे दुसरे लग्न होते. त्याची पहिली पत्नी RINKY BAJAJ ही हंसिकाची जवळची मैत्रीण असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे हंसिकाने सोहेलशी लग्न करण्याचा निर्णय घेतल्यावर सोशल मीडियावर तिला मोठ्या प्रमाणावर ट्रोल करण्यात आले होते.

# अनीत पड्डा मधुबालाच्या बायोपिकमध्ये?



बॉलिवूडमध्ये दिग्गज अभिनेत्री मधुबालाच्या आयुष्यावर बायोपिक बनणार असल्याच्या चर्चांदरम्यान आता अभिनेत्री अनीत पड्डा हिचं नाव समोर येत आहे. 'सैयारा'मधील भूमिकेमुळे चर्चेत आलेली अनीत पड्डा मधुबालाची भूमिका साकारणार असल्याची चर्चा सोशल मीडियावर सुरू झाली आहे. अनेक नेटिझन्स तिच्या लूकची तुलना मधुबालाशी करत असून काहींना ती या भूमिकेसाठी योग्य वाटत आहे. मात्र याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. दुसरीकडे नेटिझन्सनी आणखी एका अभिनेत्रीचे नाव समोर ठेवले आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्गज आणि सदाबहार अभिनेत्री मधुबाला (MADHUBALA) यांच्या आयुष्यावर बायोपिक बनण्याच्या चर्चा गेल्या काही काळापासून सुरू आहेत. या बायोपिकमध्ये मधुबालाची भूमिका कोण साकारणार, याबाबत चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता आहे. कियारानंतर या भूमिकेसाठी अभिनेत्री अनीत पड्डा हिचं नाव चर्चेत आलं आहे. पण सत्य काय आहे? अलीकडे सोशल मीडियावर काही पोस्ट आणि चर्चांमुळे अनीत पड्डा मधुबालाच्या बायोपिकमध्ये मुख्य भूमिका साकारणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. 'SAIYAARA' या चित्रपटामुळे चर्चेत आलेल्या अनीत पड्डाने अल्पावधीतच प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. तिच्या अभिनयाबरोबरच तिच्या व्यक्तिमत्त्वाची आणि लूकची तुलना काही नेटिझन्स मधुबालाशी करताना दिसत आहेत. पण रिपोर्टनुसार, इंडस्ट्रीतील सूत्रांनी या बातम्या पूर्णपणे चुकीच्या असल्याचे स्पष्ट केले आहे. एका सूत्राने स्पष्ट सांगितले की, अनीत पड्डाचे नाव मधुबालाच्या बायोपिकशी जोडणे पूर्णपणे चुकीचे आहे. अनीत पड्डाबद्दल जे काही दावे केले जात आहेत, त्यात अजिबात तथ्य नाही. हे दावे पूर्णपणे निराधार आहेत. मधुबाला हे भारतीय सिनेमातील अतिशय मोठे नाव आहे. अनीतच्या अफवा पसरल्यानंतर सूत्रांनी पुन्हा एकदा ठामपणे सांगितले की, अनीत पड्डा या प्रोजेक्टशी जोडल्या गेल्याच्या बातम्या केवळ अफवा आहेत आणि सध्या तरी असे काहीही घडत नाही. अनीतचा पहिला चित्रपट 'सैयारा' (२०२५) रिलीज झाल्यानंतर, अहान पांडे आणि अनित पड्डा हे रातोरात स्टार बनले. अहानने अली अब्बास जफरसोबत त्याचा पुढचा चित्रपट साईन केला, तर मॅडॉक हॉरर कॉमेडी युनिव्हर्सचा चित्रपट 'शक्ती शालिनी'साठी अनीतची निवड झाली. दरम्यान, मधुबाला यांच्या भूमिकेसाठी कियारा अडवाणीचे नाव समोर आळे. त्यानंतर अनितचे नाव मधुबालाच्या भूमिकेसाठी चर्चेत आले. दुसरीकडे काही नेटिझन्स म्हणताहेत- मधुबालाच्या बायोपिकसाठी तृप्ती डिमरी ही एक चांगली निवड असेल.



# IPL 2026 पहिल्या टप्प्याचं वेळापत्रक जाहीर!

## शनिवार-रविवारी एक-एक सामना होईल डबल हेडर नसणार

**महाईन्यूज । मुंबई**

**बहुप्रतिक्षित आयपीएल २०२६ चं वेळापत्रक अखेरीस बीसीसीआयाने जाहीर केलं आहे. टी-२० विश्वचषक २०२६ वर सर्व चाहत्यांच्या नजरा असतानाही आयपीएलच्या वेळापत्रकाची सर्वांना प्रतिक्षा होती. आयपीएल जणू क्रिकेटप्रेमींसाठीचा सण असतो. टी-२० विश्वचषक सुरू असताना आयपीएल २०२६ सुरू होण्याची तारीख समोर जाहीर करण्यात आली होती. आयपीएल २०२६ येत्या २८ मार्चपासून खेळवली जाणार आहे.**



पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत, त्यांच्या तारखा जाहीर झाल्यानंतर, बीसीसीआयकडून उर्वरित वेळापत्रक जाहीर केलं जाईल. त्यामुळे आता आयपीएलच्या पहिल्या टप्प्याचं वेळापत्रक सध्या जाहीर केलं आहे.

आयपीएल २०२६ यंदा शनिवारपासून सुरू होत आहे आणि शनिवार-रविवारी एक-एक सामना होईल डबल हेडर नसणार आहे. सध्याचे वेळापत्रक २८ मार्च ते १२ एप्रिल पर्यंत आहे. उर्वरित सामन्यांचे वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाईल. पहिला सामना गतविजेत्या आरसीबी आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात होईल. हा सामना बेंगळुरूमध्ये होणार आहे. पण चिन्नास्वामीच्या मैदानावर सामना होणार की नाही याचा निर्णय १३ मार्चल कमिटी घेणार आहे. दुसऱ्या दिवशी म्हणजेच रविवारी मुंबई इंडियन्सचा सामना मुंबईत केकेआर विरुद्ध होणार आहे.

यंदाचा पहिला डबल हेडर सामना ४ एप्रिल रोजी खेळला जाईल. दिवसाचा पहिला सामना दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात दुपारी ३ वाजता सुरू होईल. त्यानंतर संध्याकाळी गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना होईल. दुसऱ्या दिवशी, रविवारी आणखी दोन सामने होतील. पहिला सामना सनरायझर्स हैदराबाद आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात दुपारी ३:०० वाजता होईल. त्यानंतर संध्याकाळी ७:०० वाजता आरसीबी आणि सीएसके यांच्यात सामना होईल.

### आयपीएल २०२६ च्या पहिल्या टप्प्याचं वेळापत्रक

- २८ मार्च २०२६ (शनिवार) – रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध सनरायझर्स हेदराबाद – बंगळुरू
- २९ मार्च २०२६ (रविवार) – मुंबई इंडियन्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स, मुंबई
- ३० मार्च २०२६ (सोमवार) – राजस्थान रॉयल्स विरुद्ध चेन्नई सुपर किंग्स, गुवाहाटी
- ३१ मार्च २०२६ (मंगळवार) – पंजाब किंग्स विरुद्ध गुजरात टायटन्स, मुल्लानपूर
- १ एप्रिल २०२६ (बुधवार) – लखनौ सुपर जायंट्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स, लखनौ
- २ एप्रिल २०२६ (गुरुवार) – कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध सनरायझर्स हैदराबाद, कोलकाता
- ३ एप्रिल २०२६ (शुक्रवार) – चेन्नई सुपर किंग्स विरुद्ध चेन्नई सुपर किंग्स, चेन्नई
- ४ एप्रिल २०२६ (शनिवार) – दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध मुंबई इंडियन्स, दिल्ली
- ४ एप्रिल २०२६ (शनिवार) – गुजरात टायटन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स, अहमदाबाद
- ५ एप्रिल २०२६ (रविवार) – सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध लखनौ सुपर जायंट्स, हैदराबाद
- ६ एप्रिल २०२६ (सोमवार) – कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध पंजाब किंग्स, कोलकाता

# धोनी IPL 2026 खेळणार; CSKच्या सीईओंची महत्त्वाची अपडेट

**महाईन्यूज । दिल्ली**

**एमएस धोनी आगामी हंगामात संपूर्ण खेळेल, असे चेन्नई सुपर किंग्जचे सीईओ कासी विश्वनाथन यांनी आज (दि. ११ मार्च) स्पष्ट केले. मात्र कोचिंग स्टाफ त्याच्या भूमिकेबद्दल निर्णय घेईल, अशी माहिती चेन्नई सुपर किंग्जचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) कासी विश्वनाथन यांनी आज (११ मार्च) दिली.**



"तो सर्व सामने खेळेल," कासी विश्वनाथन चेन्नईमध्ये माध्यमांशी बोलताना सांगितले. मी सांगू शकत नाही की, यंदाच्या हंगामात तो फलंदाज म्हणून खेळणार आहे की, यष्टीरक्षक-फलंदाज म्हणून की इम्पॅक्ट प्लेअर म्हणून खेळणार आहे. हे संघ व्यवस्थापकच ठरवतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, धोनीला मागील काही काळात गुडघ्याच्या दुखापतीला तोंड द्यावे लागले असले तरी, गेल्या दोन हंगामात तो खेळला आहे. आयपीएल २०२५ मध्ये रुतुराज गायकवाडला दुखापत झाल्यानंतर धोनीने स्पर्धेच्या मध्यभागी कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारली होती.



आयपीएलच्या इतिहासात पहिल्यांदाच चेन्नई सुपर किंग्जची कामगिरी खालावली होती. मात्र पाच वेळा विजेतेपद मिळवणारा हा संघ आगामी हंगामात जोरदार पुनरागमन करण्यासाठी सज्ज झाला आहे.

कासी विश्वनाथन यांनी भारताने सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकल्याचा आनंद व्यक्त केला. विशेषतः संजू सॅमसन आणि शिवम दुबे या सीएसकेच्या खेळाडूंनी विश्वचषकात केलेल्या चमकदार कामगिरीमुळे संघाचा आत्मविश्वास वाढला असल्याचे त्यांनी सांगितले. विश्वचषकातील या यशामुळे आगामी आयपीएलमध्ये चेन्नईचा संघ अधिक जोमाने मैदानात उतरेल, असा विश्वास विश्वनाथन यांनी व्यक्त केला आहे.

सीएसके त्यांचे सर्व सामने चेन्नईमध्ये खेळेल. आम्हाला फक्त तामिळनाडूमध्ये खेळायचे आहे. बीसीसीआयकडून वेळापत्रक जाहीर होण्याची आम्ही वाट पाहत आहोत. सॅमसनच्या आगमनानंतरही सीएसके ऋतुराजच्या नेतृत्वाखाली हंगामाची सुरुवात करेल. धोनी संघातील सर्वात प्रभावशाली खेळाडूंपैकी एक असेल, असेही विश्वनाथन यांनी स्पष्ट केले.

सीएसकेने राजस्थान रॉयल्सकडून संजू सॅमसनची खरेदी केली. यानंतर यंदाच्या आयपीएलमध्ये एम. एस. धोनी खेळणार का, याबाबत चर्चा सुरू झाली होती. धोनी मार्चच्या पहिल्या आठवड्यात चेन्नईला आला. येथे इतर सहकाऱ्यांसोबत त्याने सरावही केला. ४४ वर्षीय धोनी सराववेळी तंदुरुस्त दिसत होता. आता आयपीएलच्या दोन महिन्यांच्या हंगामासाठी सज्ज असल्याचे संकेतच त्याने दिले. विशेष म्हणजे, धोनीने गेल्या महिन्यात रांचीमध्ये हलक्या नेट सेशनसह आगामी हंगामाची तयारी सुरू केली होती.

### CSK पूर्ण संघ

एमएस धोनी, रुतुराज गायकवाड, संजू सॅमसन, आयुष म्हात्रे, डेवाल्ड ब्रेविस, शिवम दुबे, उर्विल पटेल, नूर अहमद, नॅथन एलिस, श्रेयस गोपाल, खलील अहमद, रामकृष्ण घोष, मुकेश, ओव्हरटेन गुरजे, जम्बोज, जैमबोलज, अनंत चौधरी.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। गुरूवार ।
दि. 12 मार्च 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# पशुवैद्यकीय तक्रारींसाठी महापालिकेचा मोठा निर्णय!

## ८ प्रभागांसाठी ८ समन्वय अधिकारी; नागरिकांच्या तक्रारींवर तात्काळ होणार कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांच्या पशुवैद्यकीय विभागाशी संबंधित तक्रारींचे अधिक वेगाने आणि प्रभावीपणे निवारण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.**



महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहरातील श्वानांच्या उपद्रवाबाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तसेच महापौर रवि लांडगे यांनी दिलेल्या निर्देशानुसार नागरिक आणि नगरसेवकांना त्यांच्या समस्या थेट मांडता याव्यात व त्यांचे तातडीने निराकरण व्हावे यासाठी क्षेत्रीय स्तरावर नवीन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

यापूर्वी तक्रारींचे निवारण प्रामुख्याने केंद्र स्तरावरून होत असल्याने कार्यवाहीस वेळ लागत होता. मात्र आता प्रत्येक प्रभाग स्तरावर तात्काळ कार्यवाही व्हावी यासाठी आठही प्रभागांसाठी स्वतंत्र समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे तक्रारींचे वेळेत निरसन होण्यास मोठी मदत होणार आहे.

महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत प्रशासकीय कामकाजात अधिक सुसूत्रता आणण्यासाठी हा बदल करण्यात आला आहे. या यंत्रणेद्वारे श्वानांवर उपचार तसेच नसबंदी करणे, आक्रमक श्वानांना तात्पुरते निरीक्षणाखाली ठेवणे आदी सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

या निर्णयामुळे शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून तक्रार निवारण प्रक्रियेत पारदर्शकता आणि वेग येईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. महानगरपालिकेमार्फत ही सर्व कामे भारतीय प्राणी कल्याण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार करण्यात येणार आहेत.

महानगरपालिकेमार्फत हे संपूर्ण कामकाज भारतीय प्राणी कल्याण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पार पाडले जात असलेने श्वानांचे स्थलांतरण (RELOCATION) केले जात नाही, हे पशुवैद्यकीय विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे शाळा, महाविद्यालये आणि रुग्णालये यांच्या आस्थापनांना संरक्षक कुंपण करावे, त्यांच्या स्तरावर नोडल अधिकारी नेमणूक करावी आणि परिसरातील श्वानांची संख्या प्रशासनास कळवावी, असे मेलद्वारे कळविण्यात आले आहे. संबंधित संस्थांकडून ही माहिती प्राप्त झाल्यानंतर न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुढील आवश्यक कार्यवाही केली जाईल.

### समन्वय अधिकारी व संपर्क क्रमांक :

- मदनुरकर इरण्णा – अ प्रभाग – ९१३०५८०७५१
- शरद राठोड – ब प्रभाग – ७७७६८१२०९०
- राहुल गुलाले – क प्रभाग – ७९७२६०९२७८
- निरज हटवार – ड प्रभाग – ७०२०३१४९४३
- समीक्षा कुंभार – इ प्रभाग – ९४२१६३२५३८
- सुरज शिंदे – फ प्रभाग – ९३७०४४३८१५
- निशिगंधा कचवे – ग प्रभाग – ९२८४८०११७७
- सुनील कांबळे – ह प्रभाग – ८८८८४४२०४६

# महानगरपालिकेची स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात आज स्थायी समितीची सभा पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी अभिषेक बारणे होते. या बैठकीस आयुक्त श्रावण हर्डीकर, नगरसचिव मुकेश कोळप, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे यांच्यासह स्थायी समिती सदस्य व महापालिका संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.**



या बैठकीत पिंपरी चिंचवड शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी पाईपलाईन दुरुस्ती, शहरातील दिव्यांची दुरुस्ती व देखभाल, दफनभूमी सुरक्षा नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करणाऱ्या प्रकल्पांसाठी टाकणे, तसेच महापालिकेच्या नगररचना विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांची रजा मंजुरी खर्च यासह मनपा हद्दितील मालमत्ता कराची बिले वाटणाऱ्या महिलांनी नवीन मालमत्ता शोधल्यास त्यांना मनपाच्या कर संकलन विभागाच्या मंजूर दराने मानधन देण्याबाबतच्या उपसूचनेला मंजुरी देण्यात आली. या सोबतच "मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण" योजनेचे अर्ज बचत गटांतील माहिलामार्फत भरून घेतलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळ, पुणे महिला आर्थिक विकास महामंडळ या संस्थेस माहे जूलै २०२४ ते सप्टेंबर -२०२४ या कालावधीतील प्रोत्साहन भत्ता अदायगी करणे बाबतच्या उपसुचनेस आज महापालिकेच्या स्थायी समिती बैठकीत मान्यता देण्यात आली.

आजच्या स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये, पाणी पुरवठा विभागाकडील शहरातील पाण्याची तसेच नद्यांची त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करणे, घरकुल पासून जाधववाडी पंप हाऊस पर्यंत आवश्यकतेनुसार पाईप लाईन टाकणे, कुदळवाडी एसटीपी ते लक्ष्मी चौक देहू आळंदी रोड पर्यंत आवश्यकतेनुसार पाईप लाईन टाकणे, काळेवाडी परिसरातील दिव्यांच्या देखभाल व दुरुस्ती च्या कामांना मंजुरी, प्रभाग क्र. १७ मध्ये दिव्यांच्या देखभाल व दुरुस्ती करणे, प्रभाग क्र. १६ मध्ये दिव्यांच्या देखभाल व दुरस्ती करणे, ब क्षेत्रीय कार्यालयाच्या नवीन इमारतीचे विद्युत विषयक देखभाल दुरुस्ती व अनुषांघिक कामे करणे, मोशी येथे दफन भूमी विकसित करून अंतर्गत विद्युत विषयक कामे करणे, यमुनानगर रुग्णालयात जनित्र संच बसविणे, निगडी अमरधाम स्मशानभूमी येथे जनित्र संच उभारणे, प्रभाग क्र. १ व १२ मधील विविध चौक व कमानीचे सुशोभीकरण व अनुषांघिक कामे करणे, भक्ती शक्ती चौकातील अण्णाभाऊ साठे बस टर्मिनल येथे इव्ही चार्जिंग स्टेशन उभारणे, मनपा शाळा, कार्यालये, दवाखाने याठिकाणी असलेल्या पाण्याच्या टाक्यांची शास्त्रोक्त पद्धतीने साफसफाई व स्वच्छता कामांना मंजुरी देणे, जीवन नगर ताथवडे येथील पंप हाऊस चा वीज भार उपलब्ध होण्यासाठी म.रा. वि.वि कंपनीस रक्कम अदा करणे, भामा आसखेड धरणावरील अशुद्ध जलउपसा केंद्र ते नवलाख उंब्रे ब्रेकप्रेशर टाकीपर्यंत १७०० मी.मी. व्यासाची रायझिंग मेन टाकणे व बी.पी.टी. ते चिखली जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत १४०० मी.मी. व्यासाची गुरुत्व जलवाहिनी टाकणेकामी अडथळा ठरणाऱ्या उच्चदाब खांब व तारा स्थलांतरित करणे, सेक्टर २३ जलशुद्धीकरण केंद्रा जवळील म.रा.वि.वि कं. ची २२ के व्ही उपस्कर वाहिनी हटविणे, प्रभाग क्र, ११ व १३ मधील जुने गंजलेले व धोकादायक पोल बदलणे व अनुषांगिक कामे करणे, लिंकरोड चिंचवड ख्रिश्चन स्मशानभूमी, दापोडी, निगडी, दिघी मुस्लिम दफनभूमी, दिघी लिंगायत दफन भूमी येथील काळजीवाहक संस्थाना मुदतवाढ देणे, शहरातील मालमत्ता धारकांना बिले अदा करण्यासाठी नेमलेल्या महिला बचत गटांना १०% रक्कम अदा करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच नगरसचिव विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांना रजा मंजूरी खर्चास देखील आजच्या स्थायी समिती बैठकीत मान्यता देण्यात आली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने स्व. यशवंतराव चव्हाण स्मारक समितीस अनुदान देण्याच्या उपसूचनेस बैठकीत मान्यता देण्यात आली.

# ‘क’ क्षेत्रीय कार्यालयात महापौरांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

## स्वच्छता, पाणीपुरवठा, वृक्षलागवड आणि हॉकर्स झोन नियोजनावर महापौरांचे निर्देश

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**प्रत्येक प्रभागात मूलभूत नागरी सुविधा दर्जेदार आणि सुरळीतपणे मिळणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे. योग्य दाबाने पाणीपुरवठा, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता, अतिक्रमणमुक्त रस्ते तसेच पर्यावरणपूरक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी यासाठी प्रशासनाने नियोजनबद्ध आणि समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर महापालिका शाळांमधील सुविधा अधिक सक्षम करणे, हॉकर्स झोनचे योग्य नियोजन करणे आणि ‘माझी वसुंधरा’ उपक्रमात शहराला अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत आरोग्य, अतिक्रमण, पाणीपुरवठा, स्थापत्य, उद्यान, पशुवैद्यकीय आदी विभागांचा आढावा घेण्यासाठी महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकांचे आयोजन केले जात आहे. आज नेहरूनगर येथील ‘क’ क्षेत्रीय कार्यालय येथील छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस विधी समिती सभापती सुजाता बोराटे, माजी महापौर तथा नगरसदस्य राहुल जाधव, माजी महापौर तथा नगरसदस्या वैशाली घोडेकर, नगरसदस्य तुषार सहाणे, योगेश लांडगे, निखिल बो-हाडे, नगरसदस्या सारिका मासुळकर, सारिका बोऱ्हाडे, नम्रता लोंढे, अश्विनी वाबळे, रेखा देवकर, उपआयुक्त प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण दगडे यांच्यासह स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत, शहरी दळणवळण, जलनिस्सारण या विभागांचे कार्यकारी अभियंते आणि इतर संबंधित विभागांचे कर्मचारी उपस्थित होते.

क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेताना महापौर रवि लांडगे यांनी शहरातील मूलभूत नागरी सुविधांबाबत अधिक काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना दिल्या. शहरातील प्रत्येक प्रभागात नागरिकांना सुरळीत व योग्य दाबाने पाणीपुरवठा होणे ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी असून त्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबवाव्यात, असे त्यांनी स्पष्ट केले. पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होऊ नयेत यासाठी संबंधित विभागांनी नियमित तपासणी करावी तसेच या उपाययोजनांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर नागरिकांना पाण्याचा पुरवठा ठराविक वेळेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने मिळावा यासाठी पाण्याच्या वेळापत्रकाबाबतही योग्य नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले.

याशिवाय, महापौर रवि लांडगे यांनी पाणी शुद्धीकरण प्रक्रियेला अधिक सक्षम करण्यावर भर दिला. पाणीपुरवठा यंत्रणेची नियमित तपासणी करून नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही महापालिकेची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच शहरातील रस्त्यांवर ज्या ठिकाणी वारंवार कचरा साचतो त्या ठिकाणांचे सुशोभीकरण करण्याचे निर्देश देत अशा ठिकाणी सौंदर्यीकरण केल्यास नागरिक कचरा टाकण्याचे प्रमाण कमी होईल, असे त्यांनी सांगितले. पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत प्रत्येक प्रभागातून कचऱ्याची ठिकाणे पूर्णपणे हटवून शहर अधिक स्वच्छ व सुबक करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

याशिवाय प्रत्येक प्रभागातील सार्वजनिक शौचालयांची नियमित देखभाल, दुरुस्ती व स्वच्छता याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले. नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित तपासणी करून आवश्यक ती दुरुस्ती तातडीने करावी, असे त्यांनी सांगितले. शहरातील काही भागांमध्ये अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी निर्माण होत असून पादचाऱ्यांनाही अडथळ्यांचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे ज्या ठिकाणी अतिक्रमणामुळे रहदारीस किंवा पादचाऱ्यांना अडथळा निर्माण होत आहे, त्या ठिकाणांवरील अतिक्रमणे तातडीने हटविण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

याशिवाय शहरात जास्तीत जास्त वृक्षलागवड करण्यावर भर देण्याचेही महापौरांनी सांगितले. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षलागवड अत्यंत महत्त्वाची असल्याने महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या सहभागातून मोठ्या प्रमाणावर झाडे लावण्याबाबत जनजागृती करावी, असे त्यांनी नमूद केले. त्याचबरोबर महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध आहे का याची खातरजमा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी शाळा स्तरावर विविध उपक्रम राबवावेत, असेही त्यांनी सांगितले.

हॉकर्स झोनच्या नियोजनाबाबतही महापौरांनी महत्त्वपूर्ण सूचना देत प्रत्येक प्रभागात नगरसदस्यांच्या सहकार्याने योग्य जागा निश्चित करण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यामुळे फेरीवाल्यांचे नियोजनबद्ध पुनर्वसन होऊन शहरातील वाहतूक आणि पादचारी हालचाली अधिक सुलभ होतील, असे त्यांनी नमूद केले. तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी नगरसदस्यांच्या समन्वयातून प्रभागातील स्थानिक समस्या ओळखून त्या सोडविण्यावर अधिक भर द्यावा, असे निर्देश देण्यात आले.

याव्यतिरिक्त, राज्य शासनाच्या “माझी वसुंधरा” उपक्रमात शहराला प्रथम क्रमांक मिळवून देण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन महापौरांनी केले. पर्यावरण संरक्षण, स्वच्छता आणि शाश्वत विकास यांसंदर्भातील विविध उपक्रम प्रभावीपणे राबवून पिंपरी चिंचवड शहराचा मान उंचावण्यासाठी सर्व संबंधितांनी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे यांनी विविध विभागांअंतर्गत सुरू असलेल्या कामांबाबत संगणकीय सादरीकरणाद्वारे माहिती दिली. तसेच नगरसदस्यांनीही प्रभागात आवश्यक असलेल्या सोयीसुविधा आणि समस्या महापौर लांडगे यांच्या समोर मांडल्या.



# एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांची एफटीआयआय पुणे येथे शैक्षणिक भेट

## शिक्षण विश्व : चित्रपट व डिजिटल मीडियाच्या तंत्रज्ञानाचा घेतला प्रत्यक्ष अनुभव

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**आळंदी येथील एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या 'MITRONICS CLUB च्या वतीने भारतातील अग्रगण्य चित्रपट प्रशिक्षण संस्था असलेल्या 'भारतीय चित्रपट आणि दूरदर्शन संस्था' (FTII) पुणे  येथे दोन दिवसीय शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. ५ आणि ६ मार्च २०२६ रोजी झालेल्या या भेटीत एकूण ९६ विद्यार्थी आणि ६ प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला.**



या भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना चित्रपट निर्मिती, टेलिव्हिजन तंत्रज्ञान, डिजिटल मीडिया आणि ध्वनी-चित्र संवाद क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा होता. दोन दिवसांच्या या दौऱ्यात प्रत्येक दिवशी ४८ विद्यार्थी आणि ३ प्राध्यापक सहभागी झाले होते.

भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी एफटीआयआय मधील फिल्म शूटिंग स्टुडिओ, एडिटिंग लॅब, साऊंड रेकॉर्डिंग स्टुडिओ आणि कॅमेरा उपकरण कक्षांना भेट दिली. तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना आधुनिक कॅमेऱ्यांचे कार्य, प्रकाशयोजना, डिजिटल एडिटिंग आणि पोस्ट-प्रॉडक्शन् मधील व्हिज्युअल इफेक्ट्स यांबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच, विद्यार्थ्यांनी एफटीआयआयच्या विद्यार्थ्यांमार्फत बनवलेल्या लघुपटांचे स्क्रीनिंगही पाहिले, ज्यातून त्यांना कथा सांगण्याची कला आणि तांत्रिक कौशल्ये समजून घेता आली.

या शैक्षणिक दौऱ्यात केवळ चित्रपट निर्मितीच नव्हे, तर त्यामागील गुंतागुंतीच्या तंत्रज्ञानावरही भर देण्यात आला होता. यामध्ये प्रामुख्याने खालील. ब्रॉडकास्टिंग सिस्टीम: अकौस्टिक्स आणि इमेजिंग:.,डेटा इन्फ्रास्ट्रक्चर:, युआय/युएक्स या विषयांचा समावेश होता.

विद्यार्थ्यांनी संस्थेतील प्राध्यापक आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांशी संवाद साधून या क्षेत्रातील करिअरच्या संधी आणि चित्रपट उद्योगातील बदलत्या तंत्रज्ञानाविषयी माहिती जाणून घेतली.

या उपक्रमाचे यशस्वी आयोजन प्रा. रणवीर घाटे (समन्वयक), डॉ. सुनील महाजन (असोसिएट डीन, स्टुडंट अफेअर्स) आणि कॉलेजचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. , डॉ. भालचंद्र पवार, प्रा. वैभव गलबले, प्रा. जयवंत भूमकर आणि प्रा. अमोल काळे या प्राध्यापकांनी या भेटीत विद्यार्थ्यांचे नेतृत्व केले.



# न्यू सिटी प्राईड इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये सावित्रीबाई फुले पुण्यदिन व महिला दिन उत्साहात

## शिक्षण विश्व : विद्यार्थी-शिक्षकांनी स्त्रीशक्तीचा केला जागर

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले एज्युकेशन फॉउंडेशन संचालित न्यू सिटी प्राईड इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये सावित्रीबाई फुले पुण्यदिन आणि आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक अरुण चाबुकस्वार, शाळेचे उपमुख्याध्यापक सचिन कळसाईत तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.**



कार्यक्रमाचे सुंदर व प्रभावी सूत्रसंचालन स्वाती मॅडम यांनी केले. कार्यक्रमामध्ये उर्मिला मॅडम यांनी मराठी भाषण करून सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षण क्षेत्रातील महान कार्याची माहिती दिली. समृद्धी मॅडम यांनी इंग्रजी भाषणातून महिला सशक्तीकरणाचे महत्त्व सांगितले, तर मनोरमा मॅडम यांनी हिंदी भाषणातून महिलांच्या समाजातील योगदानावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमासाठी फळ्यावर सुंदर लेखन चेतना मॅडम यांनी केले. तसेच राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित केलेल्या उपक्रमातील विद्यार्थ्यांना पूजा मॅडम यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी वैभवी मॅडम यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची प्रेरणा मिळाली तसेच महिला सन्मान आणि सशक्तीकरणाचा संदेश देण्यात आला.

